स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ / /25-26**
दि.०7/०३/२०२६

**मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस यांची तुळींज येथील रुग्णालयाला भेट;**
**रुग्णालयाच्या कामकाजाविषयी केली कर्मचारी वर्गाशी चर्चा**

मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस यांनी तुळींज येथील वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयाला दि.०५ मार्च २०२६ रोजी भेट देऊन तेथील कामकाजा विषयी माहिती घेत रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व कर्मचारी यांच्याशी रुग्णालयांतील विविध सेवांबाबत चर्चा केली.

मा. उप-महापौर श्री. मार्शल लोपीस यांनी यावेळी रुग्णालयातील विविध विभागांची पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णालयाच्या एकूण कामकाजाचा आढावा घेतला तसेच रुग्णांना दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवांबाबत माहिती जाणून घेतली. या भेटीदरम्यान मा. उप-महापौरांनी रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचारी वर्गाशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, सूचना व कामकाजातील आव्हानांबाबत चर्चा केली. रुग्णांना उत्तम व तत्पर आरोग्यसेवा मिळावी यासाठी आवश्यक त्या सुविधा व व्यवस्थेबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

तसेच रुग्णालयात स्वच्छता, रुग्णसेवा व औषध उपलब्धतेबाबत विशेष लक्ष देण्याच्या सूचना देत आरोग्यसेवा अधिक प्रभावी व नागरिकाभिमुख करण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

या भेटीमुळे रुग्णालयाच्या कामकाजात अधिक सुधारणा होऊन नागरिकांना अधिक चांगली आरोग्यसेवा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या भेटीवेळी मा. उप-महापौर यांच्यासोबत मा.नगरसेवक श्री.सचिन देसाई हेदेखील उपस्थित होते